उप आयुक्त कार्यालय
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका
जा.क्र: घकव्यका/ २३०४
दिनांक: २६/०७/२०२४

प्रति,
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर...

**विषय :-गणेशोत्सव २०२४ अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पुनरावर्तन उपक्रम राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

संदर्भ:- ECOEXIST संस्थेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील आ.क्र. ४२५८ दि.०५/०७/२०२४ ने प्राप्त पत्र.

सालाबादप्रमाणे दिनांक ०७/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ या कालावधीत पुणे शहरात सर्वत्र सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या अनुषंगाने दर वर्षी पुणे महानगरपालिकेमार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असतात. यामध्ये मूर्ती संकलन केंद्रांची स्थापना, निर्माल्य संकलन केंद्रांची स्थापना, निर्माल्यापासून अगरबत्ती निर्मिती असे विविध उपक्रम पुणे महानगरपालिका व विविध स्वयं सेवी संस्थांमार्फत राबविण्यात येत असतात.

पुणे महानगरपालिका व ECOEXIST संस्थेमार्फत मागील दोन वर्षांच्या गणेशोत्सव काळात "पुनरावर्तन" हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला होता. यामध्ये ECOEXIST संस्था, स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था व इतर विविध स्वयं सेवी संस्थांमार्फत गणेश विसर्जनानंतरची शाडूची माती संकलित करून त्याचा पुर्नवापर करण्यात आला. यासाठी सदर संस्थेमार्फत शहरातील ५० ठिकाणी संकलन व्यवस्था निर्माण करण्यात आली होती.

शाडू माती एक मर्यादित संसाधन असून या मातीच्या उत्खननामुळे पर्यावरणाचा -हास होत आहे. मातीच्या मूर्तीचे विसर्जन केल्यामुळे गाळ निर्माण होऊन नदीपात्रात गाळ साठल्याने सागरी जीवनावर परिणाम होतो. या शाडू मातीचा पुर्नवापर केल्यास मूर्तीकारांना मूर्ती/माती परत देऊन त्यांना मदत करता येऊ शकते.

या अनुषंगाने ECOEXIST संस्थेसमवेत इतर स्वयंसेवी संस्था गणेशोत्सव काळात शहरामध्ये शाडू मातीच्या मुर्तीचा वापर करणे, नैसर्गिक स्त्रोतात मूर्ती विसर्जन न करणे, जास्तीत जास्त मूर्ती दान करणे इ.बाबत जनजागृती करून गणेश विसर्जनानंतरची शाडूची माती संकलित करण्याचे कामकाज करीत आहेत.

सदरील पुनरावर्तन उपक्रम या वर्षीच्या गणेशोत्सव काळात राबविण्याच्या अनुषगाने खालील बाबींस आपली प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

1. पुणे महानगरपालिका, ECOEXIST, स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था व इतर विविध स्वयं सेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव २०२४ कालावधीत पुनरावर्तन उपक्रम राबविणेस.
2. संकलन केंद्रावर संकलित होणारी शाडूची माती ECOEXIST संस्थेस पुर्नवापर करण्यासाठी देणेस.
3. पर्यावरणपूरक गणेशोत्सव व पुनरावर्तन उपक्रमाच्या जनजागृतीकरीता बॅनर्स, पोस्टर्स प्रिंटिंग करून विसर्जन ठिकाणे, शाळा, मूर्तीदान केंद्रे याठिकाणी त्याद्वारे जनजागृती करणेस.
4. पुणे महानगरपालिकेमार्फत पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ बाबत व पुनरावर्तन उपक्रमाबाबत तयार करण्यात येणा-या जनजागृती/प्रचार प्रसार साहित्यावर पुणे महानगरपालिकेचा, पुनरावर्तनचा व इतर सहभागी संस्थांचे लोगो वापरणेस.
5. पुनरावर्तन उपक्रमाचा प्रचार व प्रसार पुणे महानगरपालिकेच्या सोशल मिडीया माध्यमांद्वारे व VMD स्क्रीनद्वारे करणेस.
6. गणेशमूर्ती व विसर्जनानंतरची शाडूची माती संकलित करण्याची यंत्रणा उभारलेल्या पुणे महानगरपालिका हद्दीतील केंद्राच्या ठिकाणाहून वाहतूक करून ECOEXIST मार्फत उभारलेल्या पुर्नप्रक्रिया प्रकल्पांवर देणेस.
7. पुनरावर्तन प्रकल्पांतर्गत ECOEXIST, स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था, जिवितनदी, पूर्णम इकोव्हिजन, आदर पूनावाला व इतर स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेऊन किमान ५० मूर्ती विसर्जन केंद्रावर सदर उपक्रम राबविणेस.

मा.स.कळावे.

(संदीप कदम)
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

उपायुक्त (घनकचरा) कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. २९६२ दि. ६/८/२४
जावक क्र. ........ दि. ........

अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र. - अनिमआ(इ)/ 2947
दिनांक - 6/08/2024

क्र.२१६२ दि.०६.०८.२०२४

म.सादर...

| | | |
|---|---|---|
| विषय | गणेशोत्सव २०२४ अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पुनरावर्तन उपक्रम राबविणेस मान्यता मिळणे बाबत. | |
| खात्याचा प्रस्ताव | खात्याने जा.क्र.धकव्यका/२३०४ दि. २६.०७.२०२४ अन्वये निवेदन सादर करून, निवेदनातील नमूद बाबीचे अवलोकन होऊन, खालील बाबींस मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) यांची प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती केली आहे.<br>१)पुणे महानगरपालिका,ECOEXIST,स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था व इतर विविध स्वयं सेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव २०२४ कालावधीत पुनरावर्तन उपक्रम राबविणेस.<br>२)संकलन केंद्रावर संकलित होणारी शाडूची माती ECOEXIST संस्थेस पुनर्वापर करण्यासाठी देणेस<br>३)पर्यावरणपूरक गणेशोत्सव व पुनरावर्तन उपक्रमाच्या जनजागृतीकरीता बॅनर्स,पोस्टर्स प्रिंटींग करून विसर्जन ठिकाणे,शाळा,मुर्तीदान केंद्रे याठिकाणी त्याद्वारे जनजागृती करणेस.<br>४)पुणे महानगरपालिकेमार्फत पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ बाबत व पुनरावर्तन उपक्रमाबाबत तयार करण्यात येणाऱ्या जनजागृती/प्रचार प्रसार साहित्यावर पुणे महानगरपालिकेचा,पुनरावर्तनचा व इतर सहभागी संस्थांचे लोगो वापरणेस.<br>५) पुनरावर्तन उपक्रमाचा प्रचार व प्रसार पुणे महापालिकेच्या सोशल मिडिया माध्यमांद्वारे व VMD स्क्रीनद्वारे करणेस.<br>६)गणेशमूर्ती व विसर्जनानंतरची शाडूची माती संकलित करण्याची यंत्रणा उभारलेल्या पुणे महानगरपालिका हद्दीतील केंद्राच्या ठिकाणाहून वाहतूक करून ECOEXIST मार्फत उभारलेल्या पुनर्प्रक्रिया प्रकल्पांवर देणेस<br>७)पुनरावर्तन प्रकल्पांतर्गत ECOEXIST स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था,जीवित नदी,पूर्णम इकोव्हिजन,आदर पूनावाला व इतर स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेऊन किमान ५० मूर्ती विसर्जन केंद्रावर सदर उपक्रम राबविणेस<br>वरीलप्रमाणे, खात्याने सादर केलेल्या निवेदनातील नमूद १ ते ७ बाबी मान्यतेस सादर | (नि-२) |

खात्याचे निवेदनास अधिन राहून सादर केलेल्या निवेदनातील नमूद बाबींची कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी खात्याची राहील. तरी, निवेदनातील नमूद १ ते ७ बाबी मान्यतेस सादर

6/8/2024
पल्लवी पकारी
(वरिष्ठ लिपिक)
अति.महा.आयुक्त (इ) कार्यालय
पुणे महानगरपालिका

06/08/2024
संतोष तापकीर
(प्र.प्रशासन अधिकारी)
अति.महा.आयुक्त (इ) कार्यालय
पुणे महानगरपालिका

(पृथ्वीराज बी.पी)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट)
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
घनकचरा व्यवस्थापन विभाग
आवक क्र.:- 4803
दिनांक:- 06/08/2024
टोकन:-
प्रशा. अधिकारी | सह.महा.आयुक्त | उप.आयुक्त